<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६५/२००६ मधील</u>
<u>नि.क्र. ९१ वरील आदेश</u>
**श्री. सदाशिव यशवंत देशपांडे, वगैरे वि. श्री. वामन भागवत देशपांडे, वगैरे.**

प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ अन्वये, नि.क्र. ९१ वर दाखल केलेल्या या अर्जाद्वारे वादी हे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहेत. अर्जात नमूद कथन संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे विषद करता येईल. वाद कथन करतात की, प्रस्तुतचा दावा दाखल करतेवेळी यामध्ये केवळ वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मिळकतीत समाविष्ट केले आहेत. सदर दाव्यामध्ये घर मिळकती व गावठाण हद्दीतील मोकळया भूखंडाबाबत वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये ब–याच वर्षांपूर्वी वाटणी झाली होती. त्यामुळे, या दाव्यामध्ये त्या घर मिळकती व गावठाण हद्दीतील भूखंडांचा समावेश केला नव्हता. तथापि, प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी कुटूंबाच्या हिश्श्यास आलेल्या ग्रामपंचायत मिळकत क्र. २२५ मध्ये जबरदस्तीने व बेकायदेशीरपणे घराचे बांधकाम सुरु केले. त्यामुळे, यातील वादी यांनी या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ३७/२०१७ हा मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केला होता. सदर दाव्यातील तुर्तातूर्त मनाईच्या अर्जाचा गुणवत्तेवर निकाल होवून न्यायालयाने प्रतिवादी क्र. ३ यांच्याविरुध्द मनाई आदेश केला होता. या आदेशावर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी मा. जिल्हा न्यायालय, गडहिंग्लज यांच्या न्यायालयात किरकोळ दिवाणी अपिल क्र. ३६/२०१७ हा दाखल केला. त्या प्रकरणात वादी यांच्याविरुध्द निकाल लागल्याने त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी उपरोक्त ग्रामपंचायत मिळकतीमध्ये बांधकाम पूर्ण करुन घेतले आहे. अशाप्रकारे, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी या घरजागांबाबत झालेली पूर्वीची वाटणी अप्रत्यक्षपणे नाकारली आहे. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यात सदर मिळकती समाविष्ट करणे आवश्यक बनले आहे. प्रस्तावित दुरुस्ती वादींनी परिच्छेद क्र. २ ते ६ मध्ये नमुद केली असून त्याद्वारे वादी हे सदर घर मिळकती या दाव्यात समाविष्ट करण्याबाबत तसेच तद्नुषंगिक दुरुस्त्या इतरत्र दाव्यात करण्यास

परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. अर्जासोबत वादी श्री. सदाशिव यशवंत देशपांडे यांचे शपथपत्र जोडले आहे.

२. नि.क्र. ९३ वर दाखल केलेल्या खुलाश्याद्वारे प्रतिवादींनी अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादी कथन करतात की, अर्जातील मजकूर हा खोटा आहे. वादी हे या अर्जाद्वारे न्यायालयाची फसवणूक करीत असून प्रतिवादींना मानसिक व आर्थिक त्रासात टाकण्याच्या उद्देशाने वादींनी सदर अर्ज दाखल केला आहे. मागणीप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करण्याचे कोणतेच कारण नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार असल्याचे कथन करुन प्रतिवादींनी वादींचा प्रस्तुत अर्ज निरसीत करण्याची विनंती केली आहे.

३. वादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. ए.एस. कांबळे यांचा व प्रतिवादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. व्ही.जी. देसाई यांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुत दावा हा सांप्रत स्थितीस प्रभावी चौकशीसाठी प्रलंबित आहे. प्रस्थापित विधी सिध्दांतानुसार प्रत्यक दाव्यातील वादी हा प्रभुत्ववादी असतो व त्यास केवळ प्रतिवादीच नव्हे तर, अनुतोष निवडीचेसुध्दा स्वातंत्र्य आहे. अर्जात नमुद कथनांच्या पार्श्वपटलावर व दाव्याचे स्वरुप पाहता, प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असल्याने वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या संपूर्ण मिळकती वाटपाच्या उद्देशासाठी एकत्र संचित करणे आवश्यक बनते. असे न केल्यास, अशा समाविष्ट न केलेल्या मिळकतींबाबत दाव्यातील पक्षकारांना पुन्हा वाटणी मागण्यास कायदयाची बाधा निर्माण होते. अशा परिस्थितीत केवळ वादींचेच नव्हे तर प्रतिवादी यांची सुध्दा अपरिमित हानी संभवते. दाव्यात समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या घर मिळकती हया प्रतिवादी यांच्या स्वसंपादित असल्याचे प्रतिवादींचे कथन नाही. अशा परिस्थितीत, इतर वाद मिळकतींसोबत या मिळकतींची वाटणी करण्याची वादीची इच्छा असेल तर अशा मिळकती सुध्दा इतर मिळकतींसोबत वाटपास घेतल्या जावू शकतात. त्यामुळे, अर्जास याबाबतची तांत्रिक बाधा मुळीच नाही. दाव्याच्या प्रभावी सुनावणीस सुरुवात झाल्यानंतर वादी वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याचा अर्ज देवू शकतात

किंवा कसे हे पाहण्यासाठी संबंधित कायदयाची तरतुद पाहणे आवश्यक ठरते.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :-

*''१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अट्टींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत.*

*परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही.''*

६. उपरोक्त तरतुदीचे काळजीपूर्वक अवलोकन करता, दाव्याच्या प्रभावी सुनावणीस सुरुवात झाल्यानंतर, संबंधित पक्षकार वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, अशा प्रकारची दुरुस्ती करण्यास सक्षम नव्हता याबाबत न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय वाद प्रकरणाच्या प्रभावी सुनावणी सुरु झाल्यानंतर असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही हे स्पष्ट होते. तथापि, प्रस्तुत प्रकरणात, वादींनी शपथेवर कथन केल्यानुसार अर्जात नमुद घडामोडी हया प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर घडले असल्याने मूळ दाव्यात वादींनी प्रस्तावित मिळकती वादपत्रात समाविष्ट न करण्याचे कारण स्वयंस्पष्ट करतात. त्यामुळे, उपरोक्त तरतुदीतील परंतुकाची बाधा वादींच्या प्रस्तुत अर्जास मुळीच येत नाही. तथापि, वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास अवाजवी विलंब केला आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळे, प्रतिवादींची हानी होणार आहे. तथापि, प्रतिवादींची सदर संभाव्य हानी ही योग्य खर्चाची रक्कम त्यांना अदा करुन क्षतिपूर्ती करण्यास पात्र आहे. तसेच, प्रस्तावित दुरुस्तीद्वारे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही हे स्पष्ट आहे. त्यामुळे, प्रस्तावित दुरुस्ती मंजूर होणे क्रमप्राप्त ठरते. सबब निम्न आदेश.

**आ दे श**

नि.क्र. ९१ वरील वादपत्र दुरुस्तीचा अर्ज पुढीलप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

वादींनी प्रतिवादींना रक्कम रु. १,०००/- अदा केल्यानंतर वादींनी अर्जात मागणी केल्यानुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

खर्च रक्कम अदा करण्याची पूर्वअट राहील.

वादीने या आदेश्याचा दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्तप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

Amrit Chandrakant Birajdar

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2019.10.16 16:02:10 +0530

दि.१५/१०/२०१९ (अमृत चं. बिराजदार)

चंदगड दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 15/10/2019 |
| order signed by the P. O. on | 15/10/2019 |
| order uploaded on | 16/10/2019 |